

# शिव जन्मभुमी दर्शन

## सफर शिवनेरी, लेण्याद्री व ओझरच्या विघ्नहर्त्याची....










लेखक : अनिल महादेव पाटील

# शिवजन्मभुमी दर्शन

## (सफर शिवनेरी, लेण्याद्री व ओझरच्या विघ्नहर्त्याची)

अनिल महादेव पाटील

ई साहित्य प्रतिष्ठान

# शिवजन्मभुमी दर्शन

अनिल महादेव पाटील.

अनुसया कॉम्प्लेक्स, ३रा मजला, रूम क्र. ३०५,

शिरवाने मराठी शाळेजवळ, शिरवाने, नेरुळ

नवी मुंबई - ४००५०६

ई - मेल : anil85.patil@gmail.com

दुरध्वनी क्र. : 7758080058 / 7208721170

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तकांसाठी आपले नाव व गाव कळवा)

**प्रकाशन :२० नोव्हेंबर २०२४**



©esahity Pratishthan®2024

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

मनोगत.....



सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या किल्लयावर गेल्यावर एक अनामिक अखंड ऊर्जा मिळते आणि यातून नकळत काही सुचत ते यातून मांडण्याचं हा छोटासा प्रयत्न.

उद्देश:- मी आमच्या शिवतीर्थ रायगड प्रतिष्ठान या समूहात आहे त्याच्यामुळे नवीन किल्ले अभ्यास करायची संधी मिळते आणि आपल्या किल्ल्याची नवीन नवीन माहिती मिळते. हे पुस्तक लिहिल्याचा उद्दिष्ट हेच कि माझ्याकडून लिहिल्या गेलेल्या पुस्तकामधून कोणी एक तरी राजियांचा किल्ला अभ्यासाकरिता किंवा अनुभवण्यासाठी गेला तरी ई साहित्य प्रतिष्ठानचे आणि माझे लिखाण थोडेतरी सार्थकी लागेल.


आवड :- ऐतिहासिक वाचनाची आणि किल्ल्याची सफर करण्याची आवड असल्याने ते शब्दामध्ये साचवून ठेवणे.

मार्गदर्शक :- मी माझे किल्ले रायगड लिहिल्यावर पण ज्या ज्या व्यक्तींनी हे प्रवासवर्णन वाचले त्यांनी मला शुभेच्छा दिल्या मला माझ्या गावातूनच नव्हे तर काही परदेशी राहणाऱ्या लोकांनीही प्रतिक्रिया दिल्या आणि या पुढेही आणि या पुढेही लिखाण चालू ठेवा असा बहुमूल्य सल्ला दिला. माझे

मार्गदर्शक असणारे माझे नेहमीचे मित्रा, वडीलधाऱ्या मित्रांची तसेच माझ्या नातेवाईकांची नेहमीच साथ लाभली.

श्री शिवतीर्थ किल्ले रायगड... राजमाता जिजाऊ साहेब, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व अष्टप्रधान मंडळी तसेच स्वराज्यातील हर एक लहानथोर मावळयांच्या पदस्पर्शाने पुण्य पावन भूमीचे दर्शन घेतले तेव्हाच मनात अन अंगात अक्षय असे शिवचैतन्य निंर्माण झाले. (या पुढे) शिव-पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीची धूळ आपल्याही मस्तकावर लागावी यासाठी एक सुरु झाली गडकोटांची अखंड वारी, ज्यामध्ये आम्ही मावळे खांद्यावर भगवा मुखात "जय शिवाजी" ह्या पंचाक्षरी मंत्राचा जप करत प्रत्येक गडावर आमच्या शिवराय रुपी विठूमाऊलीचा साक्षात्कार घेण्यासाठी वारी करू लागलो. आणि आमचे पुढचे तीर्थक्षेत्र ठरले ते म्हणजे किल्ले शिवनेरी. छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी.

आम्ही सर्वांनी शिवनेरी सोबत अष्ठविनायकांपैकी लेण्याद्रीचा गिरिजात्मक आणि ओझर येथील विघ्नहर्त्याचे दर्शन घेतले. या प्रवासाचा अविस्मरणीय अनुभव मी या ठिकाणी माझ्या मोडक्या लेखणीतून मांडत आहे.




# कै. महादेव गोया पाटील

## यांना

## ।। भावपुर्ण श्रद्धांजली ।।

*काही प्रथा या आपण आपल्या एका पिढीपासुन दुसऱ्या पिढीत नेत असतो त्याला काही ऐतिहासिक, सामाजिक तर काही कौटुंबिक व्याख्या असतात. दिनांक : ०१/११/१९६२ या दिवशी माझ्या वडिलांचा स्व. श्री महादेव गोया पाटील यांचा जन्म पाभरे (कोळीवाडा) या ठिकाणी झाला. याच तारखेला दुग्धशर्करा योग म्हणजे आमच्या गावातील "श्री लक्ष्मी नारायण"मंदिराचा पहिला जीर्णोद्धार सुद्धा याच दिवशी झाला. हीच ओळख*

*प्रत्येकाच्या मनात अजुनही आहे. परमार्थाची ओढ व प्रत्येक देवतांची निस्सीम भक्ती आमच्या घरात चालू झाली होती.*

*वडिलांना लहानपणापासुन वाचनाची आवड असल्याने संस्कृत विषयावरही त्यांची जरब होती. त्यामुळेच अनेक शास्त्र-पुराणांचे गाढ अभ्यासक व उत्तम वक्ते म्हणूनही नावारूपास आले. माझे वडील म्हणजे शास्त्र-पुराणांचा सागर असे एक समीकरणच बनले होते. ते आजही पंडित या नावाने कित्येकांच्या मुखात अजरामर आहेत. त्याच ओघात भरपुर काव्ये लिहिली त्यालासुद्धा भक्तीची अजोड अशी किनार होती. आमच्या गावामधील "श्री विष्णुसागर भजन-मंडळाचे" आधारस्तंभ होते. काव्याबरोबरच भजन, लिहिणे, गाणे, लिहिणे तमाशातील पात्रांचे संवाद लिहिणे हे जोडूनच आल होतं.*

*माझं दुर्दैव कि मला माझ्या वडिलांचा जास्त सहवास लाभला नाही, पण हि वंशपरंपरागत अद्भुत शक्तीचा केवळ थोडासा अंश माझ्या लेखणीतुन अवतरला हे माझे परम सौभाग्य. त्यांची स्मृती हेच माझ्यासाठी अलौकिक ठेवा आहे.*

***माझे हे दुसरे लेखन मी माझ्या वडिलांच्या चरणी भावपुर्ण अक्षरांनी समर्पित करतो.***

## शिवनेरी किल्ल्याचा इतिहास

शिवनेरी किल्ला हा भारताच्या महाराष्ट्र राज्यात जुन्नर शहराजवळ, पुण्यापासून अंदाजे १०५ किलोमीटरवर आहे. भारत सरकारने या किल्ल्याला दिनांक २६ मे, इ.स. १९०९ रोजी महाराष्ट्रातील राष्ट्रीय संरक्षित स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. १९ फेब्रुवारी १६३० रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म शिवनेरी गडावर झाला होता. या किल्ल्याचा आकार शंकराच्या पिंडीसारखा आहे. या किल्ल्याला चारही बाजूंनी कठीण चढाव असून त्याला जिंकावयास कठीण असा बालेकिल्ला आहे. किल्ल्यावर शिवाई देवीचे छोटे मंदिर व जिजाबाई व बाल-शिवाजी यांच्या प्रतिमा आहेत. शिवनेरी अगदी जुन्नर शहरात आहे. जुन्नरमधे शिरतानाच शिवनेरीचे दर्शन होते. किल्ला तसा फार मोठा नाही. 'जीर्णनगर', 'जुन्नेर' म्हणजेच जुन्नर हे गाव इसवी सन पूर्व काळापासून प्रसिद्ध आहे. ही शक राजा नहपानाची राजधानी होती. सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी याने शकांचा नाश केला आणि जुन्नर व येथील सर्व परिसरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. नाणेघाट हा पुरातन व्यापारी मार्ग. या मार्गावरून फार मोठ्या प्रमाणात वाहतूक चालत असे. यावर नजर ठेवण्यासाठी या मार्गावरील दुर्गांची निर्मिती करण्यात आली. सातवाहनांची सत्ता स्थिरावल्यानंतर त्यांनी येथे अनेक ठिकाणी लेणी खोदवून घेतली.

सातवाहनांनंतर शिवनेरी चालुक्य व राष्ट्रकूट या राजवटींच्या सत्तेखाली होता. ११७० ते १३०८ च्या सुमारास यादवांनी येथे आपले राज्य स्थापन केले.


आणि याच काळात शिवनेरीला गडाचे स्वरूप प्राप्त झाले. नंतर इ.स. १४४३ मध्ये मलिक–उल–तुजार याने यादवांचा पराभव करून किल्ला सर केला. अशा प्रकारे किल्ला बहमनी राजवटीखाली आला. इ.स. १४७० मध्ये मलिक– उल– तुजारचा प्रतिनिधी मलिक महंमद याने किल्ला नाकेबंद करून पुन्हा सर केला. १४४६ मध्ये मलिक महंमदच्या वडिलांच्या मृत्यूनंतर निजामशाहीची स्थापना झाली. पुढे १४९३ मध्ये इथली राजधानी गडावरून अहमदनगरला हलवण्यात आली. इ.स. १५६५ मध्ये सुलतान मूर्तिजा निजामाने आपला भाऊ कासीम याला या गडावर कैदेत ठेवले होते.


यानंतर इ.स. १५९५ मध्ये किल्ला व जुन्नर प्रांत मालोजी राजे भोसले यांच्याकडे आला. जिजाबाईंचे वडील जाधवराव यांच्या हत्येनंतर १६२९ मध्ये जिजामाता गरोदर असताना शहाजीने त्यांना ५०० स्वार त्यांच्या सोबत देऊन रातोरात शिवनेरीवर नेले. 'शिवनेरी गडावर श्रीभवानीमाता शिवाई ला जीजाऊने नवस केला जर आपल्याला पुत्र झाला तर तुझें नाव ठेवीन. त्याउप्पर, शके १५५१ शुक्ल नाम संवत्सरे, फाल्गुन वद्य तृतीयेला, शुक्रवारी सूर्यास्तानंतर शिवाजीराजे यांचा जन्म जाला. तारीख होती १९ फेब्रुवारी, इसवी सन १६३०. इ.स. १६३२ मध्ये जिजाबाईने शिवाजीसह गड सोडला आणि १६३७ मध्ये किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला. १६५० मध्ये मोगलांविरूद्ध येथील महादेव कोळयांनी बंड केले. यात मोगलांचा विजय झाला. पुढे इ.स. १६७३ मध्ये शिवनेरीचा किल्लेदार अजीजखान याला फितवून किल्ल्याला माळ लावून सर करण्याचा अयशस्वी प्रयत्न राजे शिवाजीने केला. इ.स. १६७८ मध्ये जुन्नर प्रांत लुटला गेला आणि मराठ्यांनी किल्ला घेण्याचा परत एकदा प्रयत्न केला, मात्र

अपयश पदरात पडले. पुढे ३८ वर्षांनंतर १७१६ मध्ये शाहूमहाराजांनी किल्ला मराठेशाहीत आणला व नंतर तो पेशव्यांकडे हस्तांतरित करण्यात आला.

{ सौजन्य : विकिपीडिया }

नकाशा - { सौजन्य : ट्रेकक्षितिज.कॉम }





पदस्पर्श घेऊनी रायगडाचा |
ध्यास लागला तंव शिवनेरीचा ||
घेऊ पुन्हा साक्षात्कार आता |
श्री शिव-शंभो शिवजन्माचा ||

नतमस्तक होऊ सारे |
श्री शिवाईंच्या चरणावर ||
श्रम साफल्य होईल |
श्री शिव-जन्म भुमीवर ||

श्री छत्रपती शिवरायांच्या जयघोषाने |
रक्त उसळून-सळसळून यावे ||
ईतिहासाचे मुक साक्षीदार गड-किल्ले |
प्रतीक्षेत आमच्या सदैव उभे रहावे ||

# शिवजन्मभुमी

# दर्शन

## सफर शिवनेरी, लेण्याद्री व ओझरच्या

## विघ्नहर्त्याची

# (प्रवासवर्णन)

|| श्री ||

एका तीर्थक्षेत्रातून आल्यावर आपले जसे पाप धुतले जाते अशीच काही भावना आमची पहिल्या श्री शिवतीर्थ किल्ले रायगड दर्शनाने झाली होती. तीर्थक्षेत्रांचे माहेरघर म्हणजे उत्तरेत जसे काशी तसेच अखंड गडकिल्ल्यांचे आणि आम्हा मावळयांचे माहेरघर म्हणजे शिवतीर्थ रायगड किल्ला होय.

सगळया मावळयांसाठी तो पहिला अनुभव कधीच न संपणारा होता. रायगडावरच्या श्रींच्या समाधीचे दर्शन घेऊन मनात उपजलेल्या समाजकार्याचे आणि शिवरायांच्या पद-स्पर्शाने पावन झालेले किल्ले पाहण्यासाठी एकच तळमळ लागली होती. आता कोणता किल्ला पाहायचा? कोणत्या किल्ल्यावर जायचे? याचाच विचार करत होतो. खूप दिवसाने ठरले कि आता आपण शिवनेरी किल्ल्यावर जायच. ज्या किल्ल्यावर शिवरायांचा जन्म झाला ती भूमी, तो किल्ला पाहावा. मग ठरले, पण अखेरपर्यंत मुहूर्त सापडत नव्हता त्यामध्येच २-३ महिने गेले, आणि अखेरीला **जुलै महिन्याची पहिली तारीख म्हणजेच १ जुलै २०१८ हि ठरली.**

परत एकदा नियोजनाची तयारी करायची होती. कारण या वेळेस फक्त किल्लाच नाही तर सोबत देव-दर्शन करायचे होते. आम्ही **किल्ले शिवनेरी-लेण्याद्री-ओझर** असा प्रवास करायचा ठरविले, ईथेच खरी कसोटी होती. या वेळेस नवीन सभासद आमच्या सोबत येणार होते. नवीन सभासदांना जमवून घ्यायचे हे काही फारसं अवघड नव्हतं. माझेच खास मित्र होते म्हणजे मनोहर मेंदाडकर, बाळकृष्ण घावटे, रमेश कारभारी आणि अजित आगरकर आणि एक नवा चेहरा

म्हणजे सुशांत बसवत. या पाच मावळयांचे आम्ही आमच्या शिवतीर्थ रायगड प्रतिष्ठानमध्ये आनंदाने स्वागत केले.

आता नियोजन म्हणजे एखादी गाडी पाहायची होती, आपल्याला परवडेल अशी आणि ती उणीव किरण याने पूर्ण केली. त्यासाठी पण खूप गडबड झाली होती पण अखेरीस आमच्या प्रयत्नांना यश आले. गाडी बरोबर रात्री १२:०० वा. पनवेल स्टेशनला येणार होती. त्यासाठी सर्व सभासदांना संपर्क करून यादी बनवण्याचे काम अनेश आणि नवनीत यांनी केले. सर्वांनी पनवेलला थांबायचे असे ठरले. आर्थिक नियोजनाची जबाबदारी मनोहरने स्वतःकडे घेतली होती. माझ्याकडे आणि अनेशकडे स्थलदर्शन आणि वेळेचं नियोजन होत. हि जबाबदारी अवघड नव्हती पण इतकीपण सोपी नव्हती.

तारीख ठरली होती त्यानुसार नियोजन करून निघायचे होते. संध्याकाळी श्रीफळ आणि फुले न विसरता घेतली. घरी सर्वांचा आशिर्वाद घेतला व पनवेलला जायला निघालो. आमच्या मुखतः ३ टीम झाल्या होत्या. पहिली आमची म्हणजे मी आणि माझे दोन भाऊ (अनेश, अमृत). दुसरी वडाळयाची त्यात नवनीत, अक्षय, सुशांत, रमेश, रोहित आणि अजित. तिसरी टीम दिवावरून येणार होती त्यात किरण, हितेश, मनोहर, बाळकृष्ण अशी होती. जयेश हा विक्रोळीवरून थेट पनवेललाच भेटणार होता. यापैकी अजित हा काही कारणास्तव आला नाही. पनवेलला आमची वेळ रात्रीची ११.०० ते ११.३० अशी ठरली होती. सर्वांनी पनवेल रेल्वे स्टेशन बाहेर तिकीट काउंटर जवळ थांबायचे ठरले होते. घरातून निघाल्यावर सर्वांशी संवाद साधत पनवेल रेल्वे स्थानकात पोहोचलो. आमची टीम सर्वात आधी पोहोचली थोड्या-थोड्या वेळाने सगळे आले, पण नेहमीप्रमाणे आमची गाडीच आली नव्हती.

थोडा वेळ वाट पाहिल्यावर गाडी आली. नेहमीप्रमाणे गाडीला हार आणि श्रीफळाचा प्रसाद दाखवला आणि शिवगर्जना करून गाडीत बसलो.

ड्रायव्हरच्या बाजूला दिशादर्शक म्हणून मी बसलो होतो, माझ्या बाजूला (बॉडी बिल्डर) रमेश कारभारी हा होता, त्यामुळे थोडीशी अडचण वाटत होती पण त्याला काही इलाज नव्हता कारण मधल्या सिटवर ५ आणि पाठीमागच्या सिटवर ६ जण बसले होते. आमचा मार्ग पनवेल-लोणावळा वरून पुणे करत शिवनेरी जायचा असं ठरलं होत. पण चालकाने कर्जत-मुरबाड-माळशेज घाट या रस्त्याने जायला सांगितले. शेवटी एकमताने चालकाच्या माहिती असलेल्या मार्गानेच जायचं ठरले. श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष करत शिवतीर्थ रायगड प्रतिष्ठानच्या दुसऱ्या मोहिमेला सुरवात झाली.

चालकाने गाडी सुरु केली त्यावेळीस गाडीमध्ये म्युसिक सिस्टिम आहे का ते पाहिली व छत्रपती शिवाजी महाराजांचे पोवाडे लावण्यास सांगितले. त्यासाठी आमच्याकडे असणारा (Pen Drive) म्युसिक सिस्टिमला लावून पाहिला पण तो त्याला काही केल्या लागत नव्हता. शेवटी चालकाकडे असणारीच गाणी सुरु केली. थोड्याच वेळात आम्ही टोलनाक्याजवळ पोहोचलो. टोलनाक्यावरून चलन घेतलं व परत गाडी सुरु केली.

शेडुंग गाव सोडल्यावर डावीकडे **कलावंतीण** चा सुळका आणि प्रबळगडाचा आभास होत होता आणि थोडे पुढे येऊन **इर्शाळ गडाचे** दर्शन झाले. चौक नाक्याजवळ येताच मोरबे धरणाचा भलामोठा बांध लक्ष वेधून घेत होता. चौक नाक्यावरून कर्जतच्या दिशेने निघालो. तितक्यात कर्जत नजीक असणारा **सोंडाई किल्ला** आठवला. जुलै महिन्यात शिवनेरी किल्ल्यावर जात असल्याने थोडासा गारवा आणि पावसाची मध्येमध्ये ये-जा होती. कर्जतला पोहोचल्यावर शॉर्टकट न

वापरता महामार्गाने जायचे ठरवले, म्हणजे कर्जत-मुरबाड या महामार्गाने गेलो. वेळ रात्रीची असल्यामुळे गाडी सुसाट जात होती, मध्येच रमेश जागा होत चालकाला गती कमी करण्यास सांगत होता. ऐन जुलै महिना म्हणजे पावसाचे जबरदस्त थैमान असते पण आम्ही ज्या दिवशी गेलो होतो त्या दिवसाच्या ४-५ दिवस अगोदर पावसाने विश्रांती घेतली होती. कर्जत सोडून नेरळ आल्यावर नदीपासून थोडेपुढे येऊन गाडी थांबवली होती. १०-१५ मिनिटे निसर्गाच्या कुशीत आल्यासारखे वाटत होत. *निरभ्र आकाशात पौर्णिमेचा चंद्र आपल्या वैभवाने सजलेला होता आणि त्या टपोर चांदण्या जणू काही त्याच्या भोवती येण्यासाठी मंद मंद प्रकाश टाकत जवळ येत होत्या. त्या चांद प्रकाशात रात्रीची भयानताही पहुडलेल्या नवकुमारकेसारखी भासत होती.*

चालकाने गाडी पुन्हा नव्या जोशात हाकायला सुरवात केली, रात्रीच्या प्रवासात आम्ही काही एकटे नव्हतो. सोबत होती ती भल्यामोठ्या सोबतदाराची आणि तो जणू काही आमच्या सोबत लपंडाव खेळतो कि काय असे सारखं भासत होत. एखाद वळण आले कि दिसेनासा व्हायचा आणि लगेच समोर देवदूताप्रमाणे मधुर हास्य करत उभा राहायचा. तो टपोर चंद्र आपल्या प्रेमाची धुंद हळू हळू आमच्यावरही वर्षाव करत होता. त्या प्रेम-वर्षावात आमचे काही मावळे कधी झोपेच्या आधीन गेले ते समजलेसुद्धा नाही. **"निसर्ग राजा ऐक सांगतो"** हे गाणं ऐकत-ऐकत निसर्गाच्या सानिध्यात मी सुद्धा सामील झालो होतो. आता आम्ही नेरळ वरून मुरबाड कडे वेगाने झेपावत होतो, मध्येच **सिद्धगड** आणि **गोरखगडाचे** दर्शन आम्हाला होत होते. त्यांचे ते मोठं मोठे कडे बघुन मनात धडकी भरत होती. मुरबाडला मागे टाकून आम्ही आता माळशेज घाटाजवळ पोहोचलो होतो. माळशेज घाट बघून सह्यकड्यांचे या मराठी दौलतीला किती साह्य लाभले होते ते अगदी

जवळून पाहत होतो. माळशेजला पोहोचल्यावर एके ठिकाणी फलक पाहिला त्यावर असे लिहिले होते कि **छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली खिंड**. रात्रीची वेळ असल्यामुळे तिथे गाडी थांबविली नाही पण मन इतिहासात हरवून गेले कि, असे काय घडले असेल येथे कि छत्रपती शिवाजी महाराज आले असतील? हा प्रश्न एकसारखा मनात घोंघावू लागला.


माळशेजचा बोगदा पार करून थोडे पुढे आल्यावर कृष्णाबेला पॉईंट होता. त्याठिकाणी काही दुकानं बंद तर काही दुकानांमध्ये दुकानदार झोपलेले होते. तिथेच बाजूला गाडी थांबवली. रात्रीचे २.३० वाजले होते. रस्तावर सामसूम होती. चहा कुठे भेटेल का ते पाहत होतो तेवढ्यात त्यातील एक टपरीवाला आमच्या आवाजाने झोपेतून उठला आणि आमच्यासाठी चहा बनवायला सुरवात केली. थोडे अंतर दूर राहूनच माळशेज घाट पाहत होतो. चंद्राच्या प्रकाशात तो जणू काही आम्हाला जिरेटोप घातलेल्या महाराजांसारखा भासत होता, त्यांच्या त्या साजेशा रुपाला मुजऱ्यासाठी मन जवळ जायला धावत होते पण कड्यावरून वाहणाऱ्या वाऱ्याची भीती वाटत होती म्हणून दुरूनच उभे राहून ते रूप डोळयात साठवत होतो. चहा बनवून तयार झाल्यावर आवाज आला तसे सगळे चहाच्या टपरीवर जमा झालो. रात्रीच्या वेळेत अंग झोबणाऱ्या चहाचा एक घोट आणि सोबत बिस्किटे खात होतो. सगळयांचा चहाचा कार्यक्रम झाल्यावर फोटो काढला आणि शिवनेरी किल्ल्याच्या दिशेने मार्गस्थ झालो.

माळशेज घाट पार करून आम्ही आता खुबी फाट्याजवळ आलो होतो. तिथून डावीकडे पिंपळगावचे धरण आणि उजवीकडे **सिंदोळा गडाचे** उंच कडे दिसत होते. मध्येच एखाद्या गावाचे दिवे दिसत होते.

थोडेसे अंतर पुढे आल्यावर महामार्गावर मार्गदर्शन फलक लावलेला होता, एक मार्ग अहमदनगरला जाणारा आणि दुसरा शिवनेरीकडे जाणारा. आम्ही शिवनेरीकडे जाणारा रस्ता पकडला जो गणेश खिंडीतून जात होता. गणेश खिंडीत आल्यावर **हडसर किल्ल्याची** आठवण झाली. जो सातवाहन काळामध्ये नाणेघाटाच्या सरंक्षणासाठी बांधला होता. त्याचे दुसरं नाव म्हणजे **"पर्वतगड"** नावाप्रमाणेच असेल यात शंका नाही. गणेश खिंड उतरून जुन्नरच्या दिशेने वेगाने जात होतो. जुन्नरमध्ये शिरताच आम्हाला शिवनेरी गडाचे प्रारंभी दर्शन झाले होते. पहाट होत आली होती जुन्नरचे रस्ते आम्ही निरखून निरखून बघत होतो. १५-२० मिनिटांनी आम्ही छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ आलो.

छत्रपती शिवाजी महाराज चौकाजवळ येताच आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांचा जयघोष केला, नकळतच अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पूर्ण फेरी मारली. चुकून दुसऱ्या रस्ताने जात होतो पुन्हा गाडी थांबविली आणि अचूकपणे शिवनेरी किल्ल्याकडे नेली. थोडीफार वळणे घेत घेत किल्ल्याच्या पायथ्यापासून ते किल्ल्याच्या अगदी जवळ पोचलो होतो. सकाळी तिकडे कोणच नव्हतं, आणि आम्हाला आमची गाडी पार्क करायची होती. अखेर जिथून रस्ता बंद करण्यासाठी खूण करण्यात आली होती तिथुन ५-१० पावले दूर गाडी पार्क केली. तिथे छत्रपती शिवाजी महाराजांचे पोस्टर लावलेले आहे.

त्यांना नमन करून सोबत फोटो काढले. चहा घ्यायची होती पण दुकाने अद्याप उघडली नव्हती म्हणून आमचा नाईलाज झाला. फक्त मुखशुद्धी आणि मोहिमेचे वस्त्रे परिधान करून सज्ज झालो.


छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे
आज्ञापत्र
आरमारास तख्ते, सोट, डोलाच्या काठ्या आदिकरून
थोर लाकूड असावे लागते ते आपले राज्यात अरण्यामध्ये
सागवानादि वृक्ष आहेत. त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजूर लेहून
हुजरचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहित जे लागेल ते
परमुलखीहून खरेदी करून आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे
फणस आदिकरून हेही लाकडे आरमाराचे प्रयोजनाची. परंतु त्यास
हात लावू न द्यावा. काय म्हणोन की ही झाडे वर्षा दो वर्षांनी होतात
ऐसे नाही. रयतेने ही झाडे लावून लेकरांसारखी बहुतकाळ जतन
करून वाढविली. ती झाडे तोडिलियावरी त्यांचे दुःखास पारावार काय ?
येकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारासहित
स्वल्पकालेंच बुडोन नाहीसेंच होते. किंबहुना धन्याचेच पदरी
प्रजापीडणाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीही होते.
याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित येखादे झाड जे
बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी
करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषें न्यावे. बलात्कार सर्वथा न करावा.

आता आम्ही किल्ल्याच्या पायथ्याशी आलो होतो. तिथे मी २ टीम केल्या आणि प्रत्येक टीमने त्या टीममधील सदस्यांची काळजी घ्यायचे निक्षुन सांगितले. असे करत असताना आमच्या गाडीचा ड्राइव्हरसुद्धा आमच्या मोहिमेत सामील झाला. शिवनेरी किल्ल्याच्या पहिल्या पायरीवर डोके ठेवून मोहिमेला सुरवात केली.



याच गडावर अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत व हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला होता. हीच ती पायरी आणि हीच ती पावन भूमी. भूतकाळ डोळ्यासमोर उभा राहावा तशी इतिहासाची पाने डोळ्यासमोरून झर-झर जात होती. सुमारे ई. स. १५९५ मध्ये जेव्हा हा किल्ला

मालोजी राजे भोसल्यांकडे होता त्यावेळीस ५०० स्वारांसोबत माँ जिजाईसाहेब गरोदर असताना विश्वासराव जाधवरावांनी रातोरात याच "शिवनेरी" किल्ल्यावर आणले.

पहिली पायरी ओलांडून आम्ही पुढे जात होतो. अजून आम्हाला ३९९ पायऱ्या चालून जायचं होत. कारण शिवनेरी किल्ल्यावर ४०० पायऱ्या आहेत. १ नाहीतर १.३० तास नक्कीच लागणार होता, हे गृहीतच धरल होत. आम्ही सगळे पहिल्या दरवाजाजवळ पोहचलो, नावाप्रमाणे तो महादरवाजा होता. सकाळच्या वेळी शिवनेरीचा परिसर सूर्याचा सोनेरी किरणात उजळून निघत होता. त्याचे मनमोहक दृशे आमचे कॅमेरा टिपत होते.




आता आम्हाला दुसरा दरवाजा लागला त्याचे नाव होते "पीर दरवाजा". तिथून मग पुढे चालतच राहिलो. शिवकाळातल्या पायऱ्यावरून चालताना आम्हीसुद्धा शिवकाळातच आहोत असेच न राहवून वाटत होते. पुढे गणेश दरवाजाजवळ पोहोचलो. गणेश दरवाजावर आम्हाला शरभाचे शिल्प दिसले ज्यावरून या किल्ल्याचे यादवकालीन अस्तित्व सिद्ध होते. चौथा हत्ती दरवाजा होता. या दरवाजाच्या नागमोडी वाटेने वर गेलो व डाव्या बाजूस कातळ होता तेथे पाण्याची टाकी आहेत ती पाहण्यासाठी सर्वांनी एकाच क्षणात धाव घेतली. तेव्हा

बाळकृष्ण घावटे म्हणाला ज्याची पॉलिसी असेल त्यानेच पुढे जा तर लगेच पाठून रोहितने प्रत्युत्तर केल, 'मी माझी पॉलिसी काढली आहे' आणि सर्वांना हसू आले व रोहितला पॉलिसी हे नाव पडल. तसेच पुढे गेल्यावर दोन वाटा लागतात. त्यातली एक शिवाई मंदिराजवळ जाते आणि दुसरी बालेकिल्ल्याकडे जाते. आम्ही सर्वजण शिवाई मंदिराकडे निघालो. तेथे एके ठिकाणी जात्याचा एक भलामोठा भाग दिसला. ते पाहून त्याकाळातल्या गड्यांची जडणघडण काय असेल याच न सुटणार कोड पडून गेलं.

आता आम्ही शिवाई मंदिराजवळ आलो होतो. तेथील पायऱ्यांवर बसून शिवगर्जना घेतली. मंदिराच्या आवारात दीपमाळेचा स्तंभ थोड्या तुटलेल्या अवस्थेत पण अजूनही मजबूत असा होता. मंदिरामध्ये प्रवेश करणार होतो पण दरवाजाला कुलूप होते. मग तिथून पुन्हा माघारी फिरलो. मंदिराच्या बाहेर अंगणात किल्ल्याच्या कातळ खडकावर मावळयांसोबत अश्वारूढ असे छत्रपती शिवाजी



महाराजांचे एक भलं मोठं चित्र काढले होते. **अशी प्रतिकृती चौथीच्या इतिहासाच्या पुस्तकावर प्रथमच पाहिली होती. खऱ्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज आमच्या बालमनात याच चित्राने कायमचे कोरले गेले होते.**



तिथून माघारी फिरलो आणि बालेकिल्याच्या दिशेने निघालो. फाटक दरवाजा आणि कलाबूतकर दरवाजा पार करून बाल्लेकिल्ल्यात प्रवेश केला. आता नाश्ता करण्यासाठी एक योग्य अशी जागा शोधत होतो. अखेरीला एका झाडाच्या पाराखाली सगळ्यांना पुरेल अशी जागा पाहिली व त्याठिकाणी सगळे नाश्ता करण्यासाठी बसलो. कोणी-कोणी काय आणले ते लवकर आपल्या वाटीमध्ये घेण्यासाठी धडपड करत होतो. कोणी चटणी, भाजी तसेच पोळया आणल्या होत्या. काही क्षणाचा अवकाश सर्व काही संपत होत मीच अखेरपर्यंत खात होतो. पाण्याची

व्यवस्था तिथेच होती म्हणून जास्त पाण्यासाठी फिरावं लागलं नाही. जेवण उरकल्यावर बसलेल्या ठिकाणी साफ सफाई करून घेतली.





ज्याठिकाणी आम्ही नाश्ता केला त्याठिकाणी एक छोटासा बगीचा बनविला होता. हळू हळू पुढे जात होतो, बगीचा पार केल्यावर आम्हाला **अंबारखाना** लागला. त्याच्या तुटलेल्या भिंतीकडे लगेच लक्ष गेले. रस्ताच्या कडेलाच अंबारखाना असा नामफलक दिसत होता. खूप मोठा असा अंबारखाना पाहून त्यावेळी किती मावळे किल्ल्यावर राहत असतील याची कल्पना आली. शिवनेरी किल्ल्यावर जेव्हा १६७३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीतील इंग्रज अधिकारी डॉ. जॉन फ्रायर आला तेव्हा त्याने आपल्या ग्रंथामध्ये असे नमूद केले कि, या अंबारखानामध्ये इतके अन्न आहे जे किल्ल्यावरील राहणाऱ्या किमान १००० कुटूंबांना तो ७ वर्षे पुरेल. त्या अंबारखानाचे थोडे निरीक्षण करून पुढे निघालो. तिथून



पुन्हा दोन वाटा जात होत्या एक सरळ पुढे जी शिवकुंजासमोर घेऊन जाते आणि दुसरी टेकडीवर जाते. आम्ही शिवकुंजाच्या वाटेने चालत राहिलो. जाणाऱ्या पायवाटेच्या डावीबाजूला रेलिंगचे कडे लावले होते. आणि तिथे पाण्यासाठी भरपूर असे हौद खोदलेले दिसत होते. तिथूनच समोर किल्ल्याची एक बाजू दिसत होती जिथे जिजामातोश्रींचा वाडा होता. कड्याच्या बाजूने जास्वदींची भरपूर अशी रोपे लावली होती. न राहवून दोन-तीन रोपांच्या फांद्या सोबत घेतल्या. शिवनेरीची किल्ल्याची एक आठवण राहावी म्हणून सोबत घेतल्या होत्या एकार्थी पाहायला गेले तर ते चुकीचे होते पण तरीसुद्धा घेतले.

शिवकुंजाकडे जाताना कडेच्या डाव्या बाजूस डोंगरात कोरलेल्या पाण्याच्या दोन टाक्यांकडे लक्ष गेलं, शिवनेरी गडावरील सर्वात मोठ्या पाण्याचा साठा असलेली गंगा-जमुना टाके पाहिली.




डोंगराच्या पोटात कातळामध्ये खोदलेल्या त्या पाण्याच्या टाक्या बाहेरूनच खूप वेळ पाहिल्या, पाण्याचे बाष्पीभवन होऊ नये म्हणून हि उपाययोजना केली असेल असे मला वाटले व परत मागे फिरलो.

आता शिवकुंजाची इमारत आणि शिवजन्मस्थान असलेली इमारत दिसू लागली होती. आम्ही प्रथम शिव कुंज इमारतीपाशी गेलो. त्याला बाहेरून कुलूप लावले होते. मग आम्ही बाहेरूनच माँ जिजाई आणि बाल शिवाजी राजे यांचे दर्शन घेतले. **बाळ शिवरायांचा असा आवेश दिसत होता कि जणू काही माँ जिजाईसाहेब यांच्या आदेशाचे पालन करण्यासाठीच ते आहेत.** त्यांची शिकवण अतिशय तन्मयतेने मनात साठवून ठेवणारे ते मनमोहक असे दृश्य भासत होते. आत जाण्यासाठी काही मार्ग नसल्याने आमची सर्वांची पावले आपसूकच शिवजन्म स्थळाकडे वळाली.



कमानी मशीद पार करून हमामखान्याजवळ येताना, कमानी मशिदच्या पाठीमागे एक पाण्याचे मोठे टाके दिसले. हमामखान्याची एकच वास्तू उभी होती आणि बाकी फक्त चौथरेच दिसत होते. **आता ज्या ओढीने आम्ही शिवनेरीवर आलो ती भव्य इमारत आमच्यासमोर दिसत होती.**



शिव-प्रभात उजळली
ध्यास नवा घेऊनी
सोनेरी किरणांनी तेव्हा
मनातली कवाडे उघडली



दडलेली कोपऱ्यात मनाच्या
ओठांवर आज ही आली
अगाध श्री शिव-लिला
लिहिण्यास सज्ज झाली

शिवाईच्या पुण्याईने
शिवनेरीवर जन्म झाला
आक्रोशणारा भयाण काळोखही
शिवसुर्य-तेजाने आनंदित झाला

साऱ्यांचा तारणहार अवतरला
माँ जिजाईपोटी शिवबा जन्मला
**माँ जिजाईपोटी शिवबा जन्मला…….!**





शिवजन्म इमारतीच्या जवळ येताच पादत्राणे पायातून बाजूला काढली. इमारतीमध्ये प्रवेश केल्यांनतर समोरच मुख्य दरवाजाला कुलूप दिसले. बंद दरवाजाच्या आत डोकावून पाहिले असता **आतमध्ये समोरच शिवरायांची मुर्ती दिसली व डाव्या बाजूस शिव जन्माचा पाळणा आजही दिमाखात दिसत आहे.** ते सार पाहून शिवजन्म काळात ओघानेच गेलो. शिवजन्मापुर्वी परकीय सत्तानी अवघा महाराष्ट्र अन्यायाने भरडून निघाला होता. याच पुणे शहरात इ.स. १६३० साली आदिलशाही सरदार मुरार जगदेव याने गाढवाचा नांगर फिरवला होता. घर-दार ही लुटली होती. अनेक स्त्रियांवर अनन्वित अत्याचार केले होते. श्री समर्थ रामदास स्वामी याचे वर्णन असे करतात-

कितीयेक ग्रामे चि ते वोस झाली
पिके सर्व धान्ये च नाना बुडाली.
किती येक धाडीवरी धाडी नेती.
द्रया सैन्यकांचेही संव्हार होती.

माँ जिजाईपोटी प्रत्यक्ष सूर्यनारायणानेच जन्म घेतला. शहाजीराजे व माँ जिजाऊंच्या या पुत्रानेच हिंदुस्तानात जुलमी आणि अमानवी सत्तेपुढे लाचार झालेल्यांच्या बाहुत आणि मनात पुन्हा स्वाभिमानाची अखंडज्योत पेटवली आणि

स्वतःचे असे स्वराज्य निर्मिले. त्या प्रति शिवतेजाचे प्रतिबिंबच शिवनेरीवर तेजाळत होते. याच पाळणाघरातून साखरेच्या कितीतरी वाट्या जुन्नर गावात प्रसाद म्हणून दिल्या असतील. पाळणाघराच्या पहिल्या मजल्यावर जाऊन काही क्षण निवांत बसलो. मजल्यावरील झरोक्यातून जुन्नर परिसर खूप उठून दिसत होता. त्या प्रत्येक




झरोक्यात कलात्मक असे नक्षीकाम केले होते.

थोडा वेळ तिथेच बसुन शिवजन्माचे क्षण कसे असतील याच विचारात इतिहासाच्या पाऊलखुणा शोधण्याचा प्रयत्न करू लागलो. खिडक्या व त्यावरील मनमोहक नक्षीकाम तसेच वर गोलघुमटावर सुद्धा नजर फिरत होती. थोड्या वेळाने आम्ही एक-एक करत पहिल्या मजल्यावरून खाली आलो. पुन्हा एकदा शिव पाळण्याचे दर्शन घेतले.

तिथून आम्ही बदामी तलावाच्या दिशेने गेलो. बदामी तलावाच्या जवळ आल्यावर पूर्ण तलावाला एक फेरी मारली. तलावात पाणी अगदी कमी होते, बघायला गेलो तर तलावाच्या एकाच दिशेला थोडे पाणी होते. तलावाच्या मधोमध एक स्तंभ आहे. तो स्तंभ पाण्याची उंची मोजण्यासाठी असेल किंवा त्यावेळी तलावाची शोभा वाढवण्यासाठी कारंजे बनवण्यासाठी असेल. बदामी तलावाचे

आणखी एक वैशिष्टय म्हणजे तलावाच्या दक्षिणेला स्तंभाच्या अगदी समोर बसण्यासाठी किंवा आराम करण्यासाठी जागा मुद्दाम करण्यात आली होती. २ दरवाजे भिंतीच्या पुढच्या बाजूला बनवून त्यामध्ये २ ते ३ फूट इतकी मोकळी जागा ठेवली होती त्याठिकाणी गेलो तेव्हा थंडगार हवेची झुळूक शरीराला स्पर्शून गेली. तेव्हा वाटले कि जेव्हा अति उष्णता असेल तेव्हा खासे मंडळी याच ठिकाणी गारवा घेण्यासाठी नक्कीच येत असतील. तलावाच्या काठावर आमचे सर्व मावळे थकून-भागून बसले होते. काहीजण थकले होते ते पुन्हा माघारी फिरले पण आम्ही पुढे काहीतरी असेल याच्या शोधात निघालो. थोडे पुढे चालून गेल्यावर समजले कि इथून पुढे टकमक टोक आहे हे आमच्या ध्यानीमनीच नव्हते. लगबगीने टकमक टोकावर जायला निघालो. समोर एक भिंत दिसत होती जिला आत प्रवेश करण्यासाठी मधोमध एक छोटेखाणी दरवाजा केला होता त्यामधूच वाकून आत गेलो. आत गेल्यावर १०-१५ जण उभे राहतील इतकीच जागा आहे. बाहेरून अर्धवर्तुळाकार आकारात तटबंदी बांधली गेली आहे. हेच या शिवनेरी किल्ल्यावरचे टकमक टोक. या टकमक टोकावरून पूर्ण जुन्नर परिसर उठून दिसत होता. ओझरचा विघ्नेश्वर आणि लेण्याद्रीचा गिरिजात्मकचा भला मोठा डोंगर हाकेच्या अंतरावर भासत होता. त्याठिकाणी वारासुद्धा खूप जोरात वाहत होता. त्या वाऱ्याच्या जोरावर आमचे आणि स्वराज्याचे भगवे निशाण डौलात फडकत होते. त्या ठिकाणी सुद्धा आम्ही कॅमेरा चालू करून तो क्षण बंदिस्त करून घेतला.

शिवनेरीच्या टकमक टोकाचे बांधकाम कसे केले असेल याचे कुतूहल मनात ठेऊन आम्ही मागे फिरण्याचा निर्णय घेतला. आमचे अर्धे मावळे बदामी तलावाकडेच किंबहुना माघारी गेले असल्याची जाणीव झाली.

टकमक टोक पाहून आम्ही परतीच्या दिशेने निघाले. पुन्हा एकदा परिसर न्याहाळत मागे जाऊ लागलो. बदामी तलावाकडे आल्यावर आमचे सोबती तिथे नव्हते. बदामी तलावाकडे पुन्हा नजर फिरवत श्री शिवजन्म इमारतीकडे निघालो तिकडे आलो तर आमचे मावळे शिवजन्म इमारतीच्या समोरच चिरेबंद जोत्यावर पूर्ण लोटांगण घालून झालेल्या परिश्रमाचे ओझे कमी करत होते. आम्ही त्याठिकाणी आलो व त्यांच्या बाजूला बॅगेची उशी करून थंडगार दगडांच्या जोत्यावर विश्रामासाठी पहुडलो. श्रींच्या जन्मभुमीवर आम्ही फक्त मस्तकच नव्हे तर आम्ही आमचे शरीरच झोकून दिले. त्या शिवशक्ती पिठाकडे तन-मन आणि वाणीने पुन्हा एकदा शिव-चरित्रात मंत्रमुग्ध झालो. काही क्षण आराम केल्यावर पुन्हा शिवकुंजाच्या दिशेने निघालो. तिथून परत माघारी यायला मन धजावत नव्हते.

आम्ही आता हमामखाण्याच्या खालच्या बाजूने जात होतो. कमानी मशीद पार करून शिवकुंजाच्या मागच्या बाजुने मैदानातून किल्ल्याच्या वरच्या भागाच्या दिशेने निघालो. थोडे अंतर गेल्यावर आम्हाला कोळी चौथरा दिसला. आम्हीही कोळीच असल्याने नकळत महादेव कोळयांच्या बलिदानाचे अस्तित्व सांगणाऱ्या वास्तूवर पाहून डोळे काही क्षण अभिमानाने पाणावले.




Anish Patil PHOTOGRAPHY


Anish Patil PHOTOGRAPHY

निजामशाहीचा जेव्हा अस्त झाला तेव्हा आदिलशाही आणि मोगल साम्राज्याचे त्यांचा असलेल्या सीमाप्रांताकडे थोडे दुर्लक्ष झाले आणि हीच संधी पाहून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या हिंदवी स्वराज्याच्या स्फुर्तीने मावळमधील **महादेव कोळी वीर खेम नाईक** यांच्या नेतृत्वात महादेव कोळ्यांनी शिवनेरी किल्लाचा ताबा घेतला आणि जुन्नर प्रांतावर आपला अधिकार प्रस्तापित केला. सन १६५० मध्ये मोघलांनी महादेव कोळ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी भली मोठी फौज पाठवली. कोळ्याचे सैन्य हे नवखे असल्यामुळे उभ्या असलेल्या बलाढ्य अश्या मोघल फौजेसमोर शरणागती पत्करली आणि शेवट इतका भयावह झाला कि एका चौथऱ्यावर १५०० महादेव कोळी लोकांना बंदिस्त करून शिरच्छेद केला. इतकेच नव्हे तर मुघल राजवटीची दहशत कायम राहावी म्हणून नाईकांच्या रक्त संबंधीत लोकांना शिवनेरीवर आणून त्यांनाही मारले गेले. कालांतराने याची आठवण म्हणून त्यावर गोल घुमुट बांधून घेतला. त्यावर फारसी शब्दात लिहिलेले २ शिलालेख आहे. त्या १५०० व्यतिरिक्त अजून कितीतरी माणसे लढताना वीर गतीस प्राप्त झाले असतील, कितीतरी जखमी होऊन गेले असतील, कितीतरी दूर राहून आपल्या माणसांना मृत्यूच्या दाढेत पडत असताना पाहून आपल्या अस्तित्वासाठी दूर गेले असतील त्यांची गिनतीच नाही. आज आमचे दुर्देव कि त्यांची नावे, ते कोण होते, त्यांच्या परिवाराचे काय झाले हे कोणालाच माहित नाही पर्यायाने हे इतिहासालासुद्धा माहित नाही. फक्त या **चौथऱ्याला महादेव कोळी** म्हणतात हीच त्यांची आठवण. हेच त्यांचा शौर्याचे प्रतीक. तो विचार मनात येताच मन खूप गहिवरले.

घेऊनि स्फूर्ती तव शिवरायांची
अभिमानाने आमची फुलली छाती |
स्वधर्म अन मातृभूमीच्या रक्षणासाठी
चाल केली शिवनेरीवर कोळयांनी ||

जिंकूनि घेतला गड शिवनेरीचा
प्रांतावर सारा अधिकार आमुचा |
घेऊनि धसका महादेव कोळयांचा
चवताळून उठला शहेनशहा मोघलांचा ||


हिरव्या वादळाने मोठा आकांत करुनी
पाठविली लाखभर फौज शिवनेरीवर |
त्वेषाने लढले परी माघारी न फिरले
मरण दिसत असूनही पूर्ण कुळांचे ||
मूठभर मावळे तुटुनी पडले
शहिद झाले असतील कितीतरी |
शिताफीने बंधिस्त करुनि दीड-हजारांवर
आणले साखळदंडात उघड्या मैदानावर ||

कत्तल आरंभिली काळाने क्रूरतेने
न पाहुनी कोण समोर वृद्ध कि तरुण |
उडविल्या माना मिळताच इशारा


चौथऱ्यावर उसळला पूर रक्ताचा ||

दीड- हजारांच्या मुंडकांच्या राशी
निशब्द शिवनेरीवर गाडली गेली |
अर्पूनि सर्वस्व मायभूमीच्या मायेपोटी
महादेव चौथऱ्यात "अमर" झाली ||

स्वीकार करुनि घे आता
वाहतो गहिवरलेल्या अश्रूंच्या धारा |
तुमच्या शौर्याच्या करुनि गर्जना
अभिमानाने कंठ दाटतो गळा ||






SHOT ON REDMI NOTE5 PRO
MI DUAL CAMERA

महादेव कोळी चौथरा हा शिवनेरी किल्ल्यावरील सर्वात उंचावरचा भाग आहे. तिकडे जाताना आमची थोडी दमछाक झाली होती. महादेव कोळी चौथरा पाहून आम्ही आता गड उतरायला सुरवात केली. छोट्याश्या पायवाटेने आम्ही गड उतरत होतो. ती छोटीशी पायवाट नागमोडी आणि कुठे कुठे धोक्याची वळणे घेत खाली येत होती. आम्ही आमचा तोल सावरत हळू हळू खाली येत होतो. खाली येताना एका दगडावर कुणीतरी नावे लिहिली होती त्यावर रमेश कारभारी याने आपला राग व्यक्त केला. गड- किल्ले ह्या जणू काही आपल्या घरच्या वस्तू समजून नाव लिहिण्यात खुपजण धन्यता मानतात. स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांनी इतके किल्ले बांधून आणि जिंकून कधीही त्यावर आपले नाव लिहिले नाही किंवा आपल्या नातेवाईक मंडीळीचे नाव लिहिले नाहीत पण काहीजण ऐतिहासिक वास्तूंवर आपले नाव लिहून स्वतःला धन्य समजतात. यात त्याचा बालिशपणा किती आहे हे प्रत्कर्षाने जाणवते.

आता आम्ही पुन्हा शिवाई मंदिराकडे जात होतो कारण सकाळी आलो तेव्हा मंदिराचे दरवाजे बंद होते. मंदिराजवळ आल्यावर पायरीवर नियमाने माथा टेकून पुढे आलो. एक-एक करून आम्ही मंदिरात प्रवेश केला. शिवाई मंदिराचा गाभारा लाकडी आणि दगडी कलाकृतीने मनाचा वेध घेत होता. समोर एक पुजारी आपल्या नित्यक्रमात मश्गुल होता. आम्ही आल्याची पुजाऱ्याला चाहूल लागली तसा तो थोडा बाजूला झाला. आम्ही सगळयांनी सोबत आणलेल्या फुलांनी शिवाई देवीवर सुगंधित फुलांचा अभिषेक केला. फुले वाहून झाल्यावर देवीचा अंगारा माथ्याला लावून थोडे पैसे दानपेटीत टाकले. ते मूर्तिमंत रूप डोळयात आणि मनात साठवण्याचा आम्ही सर्वजण प्रयत्न करू लागलो.

नतमस्तक होऊ सारे...
श्री शिवाईंच्या चरणावर....
श्रम साफल्य होईल...
श्री शिव-जन्म भुमीवर....

श्री छत्रपती शिवरायांच्या जयघोषाने...
रक्त उसळून-सळसळून यावे....
ईतिहासाचे मुक साक्षीदार गड-किल्ले...
प्रतीक्षेत आमच्या सदैव उभे रहावे....



याच देवीसमोर माँ जिजाईनी नवस केला होता कि जर मला मुलगा झाला तर तुझेच नाव देईन आणि अनेकांच्या तपश्चर्येचे फळ आणि आईच्या सादेला हाक देऊन श्री भवानी माता म्हणजेच शिवाई माता प्रसन्न झाली. याच पुण्यपावन गडावर १९ फेब्रुवारी, १६३० मध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्म झाला.

शिवाई देवीचे दर्शन घेऊन झाल्यावर सर्वजण आता एक-एक दरवाजा ओलांडत वेगाने खाली निघाले होते. गड चढताना झालेली दमछाक आता पूर्ण निघून गेली होती. काही क्षणात आम्ही गड उतार झालो आणि न विसरता पुन्हा एकदा पहिल्या पायरीवर नतमस्तक झालो. झालेल्या परिश्रमाचे आता खऱ्या अर्थाने सार्थक झाले होते. आम्ही जेव्हा सकाळी आलो होतो तेव्हा येथे कुणीच नव्हते पण आता खूप ठिकाणी सरबत, छास इतर खायचे पदार्थ विकणारे बसले होते. आम्ही एका ठिकाणी गेलो तिथून तिखट मसाला लावलेल्या कैरीचा आस्वाद घेतला आणि कुणी कोकम सरबत तर कुणी छास प्यायले. आता आम्हाला लेणाद्रीला जायचे होते म्हणून अधिक वेळ न दवडता लेण्याद्रीकडे जायला निघालो.

आम्ही सर्वजण गाडीमध्ये आपापल्या जागेत येऊन बसलो. गाडीचालकाने गाडी चालू केली आणि लेणाद्रीकडे वेगाने झेपावू लागलो. अर्धातासाच्या आतच आम्ही लेणाद्री कडे पोहोचलो. चालकाने गाडी पार्क केली. आम्ही सगळे गाडीतून उतरून लेण्याद्री गणपती मंदिराकडे जाणाऱ्या दगडी वाटेला गेलो पण तिथून पुढे न जाता थोडेसे फ्रेश होण्यासाठी स्वच्छता गृहामध्ये जाऊन मोकळे होऊन आलो. तिथून आल्यावर लेणाद्री गणपतीसाठी प्रवेश पत्रिका प्रत्येकी १५ रुपये देऊन त्याची प्रत घेतली. त्याच ठिकाणी महाप्रसाद आहे याची चौकशी केली तेव्हा महाप्रसादामध्ये खीर आहे हे ऐकून भूक वाढली होती पण भाविक मोठ्या प्रमाणात

असल्याने जास्तच उशीर होईल म्हणुन आम्ही तिथे न जेवता ओझरला जाऊन जेवणाची व्यवस्था करायचे असे ठरले.

आता आम्ही लेणाद्री गणपतीचे दर्शन घेण्यास सज्ज झालो होतो. **लेणाद्री गणपती हा जवळ-जवळ ३० बौद्ध लेण्यांचा समूह आहे त्यामध्ये सातव्या लेण्यात श्री लेणाद्रीचे म्हणजे अष्टविनायकापैकी सहावा असा गिरिजात्मकाचे मंदिर आहे.** प्रथम शिवरायांचा जयजयकार केला आणि मग गणपतीचा जयघोषकरून श्री गिरिजात्मकाचे दर्शन घेण्यास निघालो.

पहिली पायरी ओलांडली तेव्हा सगळे आम्ही सोबत होतो, पण हळू हळू मी किरण वेटकोळी आणि रमेश कारभारी असे काही जण मागे पडू लागलो. मनोहर मेंदाडकर हा देखील पुढे जाऊन माझ्यासाठी मध्ये मध्ये थांबत होता. गणपती मंदिराच्या लेण्याजवळ पोहोचायला ३३८ पायऱ्या होत्या. एक - एक पायरी आम्ही मोठ्या मुश्कीलने पार करत होतो. शिवनेरी गडावर आम्ही भल्या पहाटे गेलो होतो म्हणून इतकी दमछाक झाली नव्हती पण आता अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या होत्या. योगायोगाने त्या दिवशी मंगळवार असल्याने देवदर्शनासाठी भाविकांची ये-जा चालू होती. आम्ही अर्ध्यावर पोहोचलॊ होतो**.** मध्येच माकडांच्या मर्कट चेष्ठा पाहून शिणलेल्या चेहऱ्यावर हसू येत होत. किरण आणि मी सोबत सोबत जात मध्येच घोटभर पाणी पिऊन किती अंतर कापायचे आहे याचे मोजमाप करत होतो.

*पाहायला गेले तर निसर्गाचा नियमच आहे कि जेव्हा आपण उंचावर किंवा एखाद्या डोंगरावर जायचा प्रयत्न करतो तेव्हा आपल्याला झुकूनच चालायला लागते.*

*जेव्हा एखादा वक्ती झुकलेल्या अवस्थेत जात असतो तेव्हा समजावा कि तो अथक परिश्रम करून यशाच्या पायरीवर जात आहे आणि कोणी ताठ वागत असेल तर समजावे कि तो अभिमानाने अधोगतीकडे म्हणजेच अपयशाकडे जात आहे, आम्हालासुद्धा क्षणभर असेच वाटले.*

समोर आमच्याकडे पाहत असलेल्या शिवनेरी गडाकडे पाहून मनात शिव चैतन्य संचारले. आम्ही श्री गिरिजात्मजकाच्या सदैव आशीर्वादासाठी उंचावलेल्या हाताखाली नम्रपणे झुकून कृपाशिर्वाद घेण्यासाठी सरसावून निघालो. जाताना काही मनमोहक दृशे कॅमेरामध्ये बंधिस्त होत गेली. थोड्या वेळात आम्ही श्री लेणाद्री गणपती जवळ पोहोचलो. मंदिराच्या उजव्या बाजूला अजून एक मोठी लेणी होती पण प्रथम आम्ही गणरायाचे दर्शन घेणार होतो म्हणून तिकडे गेलो नाही. माझ्या अगोदर आमचे मावळे पोहोचले होते फक्त रमेश कारभारी आणि किरण वेटकोळी यायचा बाकी होता. तोपर्यंत आम्ही लेण्यावरील असणारी शिल्पे पाहत होतो. सगळे आल्यावर आम्ही मुख्य मंदिरामध्ये प्रवेश केला.



मंदिरा बाहेर ३ खांबावर हत्ती, घोडे सिंह या प्राण्याची चित्र कोरलेली आहेत. मंदिराचा दरवाजा लहान होता त्याला झुकून नमस्कार केला आणि मंदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश केला. प्रथम आम्ही श्री गिरिजात्मजाचे मनोभावे दर्शन घेतले. शेंदरी रंगाचे गणरायाचे रूप अतिशय सुंदर दिसत होते. सोनेरी रंगाचा मुकुट आणि लहान डोळयामध्ये असली माणके आणि मध्यभागी वैष्णवी टिळा आणि त्यावर आलेला शेंदरी रंग असे श्री गणेशाचे वेगळे स्वरूप आम्ही पाहत होतो. मूर्ती रेखीव नसली तरी तिच्या मध्ये अनेकांच्या पूजनेने तेजोमय असे स्वरूप जाणवत होते अश्या श्री गिरिजात्मजाचे मनोभावे दर्शन घेऊन ते रूप मनात साठवण्यासाठी सभामंडपात थोडे बसून राहिलो.

*अशी आख्यायिका सांगितली जाते कि या ठिकाणी माता पार्वतीने पुत्र व्हावा म्हणून १२ वर्षे कठोर तपश्चर्या केली आणि या तपश्चर्याचे फलद्रुप म्हणून* ***श्री गणेश भाद्रपद शुद्ध चतुर्थीला*** *लहान रूपामध्ये प्रकट झाले. गिरीजा म्हणजे माता आणि आत्मज म्हणजे मुलगा म्हणून या गणपतीचे नाव* ***गिरिजात्मज*** *असे पडले.*

गिरिजात्मकाच्या मंदिरासोबत या ठिकाणी अजून २९ अश्या लेण्या असल्यामुळे या ठिकाणाला लेणाद्री असेही म्हणतात. अष्टविनायकांपैकी श्री गिरिजात्मकाचे मंदिर हे एक आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात प्रत्येकी १८ अशा गुहा आहेत. असे सांगितले जाते कि या प्रत्येक गुहेत अनेक ऋषीमुनींनी तपश्चर्या केलेली आहे. आम्ही प्रत्येक गुहेमध्ये कुतुहुलापोटी जाऊन आलो.

बाहेर आल्यावर बाजूला असलेल्या लेण्यांमध्ये गेलो. काही ठिकाणी माकडे त्यांना खायला काही भेटेल या आशेने आमच्याकडे भावूक नजरेने पाहत होते. आम्ही सहाव्या लेण्यांमध्ये गेलो त्या ठिकाणी बौद्धस्तूप कोरलेले होते. असे

बौद्धस्तूप फक्त ६व्या आणि १४व्या शतकामधले असून हे बौद्धस्तूप अजिंठा- वेरूळ येथील बौद्धस्तूपाशी मिळते जुळते आहेत. या स्तूपाला गोलघुमट असेही म्हणतात. या लेणीमध्ये खांब असून सुंदर असे नक्षीकाम आहे.



बौद्धस्तूपातील गोल घुमुट रेखीव असून त्यावर आयताकृती जागा ठेवली होती. आम्ही त्या गोलघुमुट स्तूपाजवळ गेल्यावर असे पाहिले कि काही जण त्या आयताकृतीवर सुट्टे नाणे फेकत होते. ज्याचे नाणे वर राहत होते तो आनंदाने बाहेर पडत होता. हे पाहिल्यावर आमच्यामधूनही काही जण नाणे वर फेकण्याचा प्रयत्न करू लागले पण कुणाचेही नाणे वर जाऊन स्तिरावत नव्हते. जिथून फेकायचो त्याच्या विरुद्ध किंव्हा ९० अंशाच्या कोनामधून खाली पडायचे व तेच नाणे घेण्यासाठी आमच्या सर्वांची एकच झुंबड उडायची. हे करत असतानाच बाळकृष्ण घावटे हा मध्येच जोर-जोरात "हर हर महादेव" अशी हाकाटी देऊ लागला. त्यामुळे आपसूकच सगळयांना चेव चढला व सगळे जण "हर हर

महादेव" असे बोलू लागले. एक तर आम्ही आत बौद्धस्तूपामध्ये होतो त्यामुळे आमचा इतका गोंगाट झाला कि तो ऐकून आम्ही १३-१४ नसून आमची संख्या १०० वर असेल असे वाटले. तिथे येणाऱ्यांचे पाय सुरवातीलाच अडखळले. ते पाहून अचानक मनात विचार आला कि हीच योजना सुभेदार कोंडाजी फर्जंद यांनी पन्हाळगड घेण्यासाठी केली होती. शिवरायांनी मानाचे कडे स्वतः हाताला बांधले तेव्हाच पन्हाळा खऱ्या अर्थाने स्वराज्यात आला होता. शिवरायांनी दिलेले सोन्याचे मानाचे कडे घेऊन पन्हाळागड काबीज करण्यासाठी निघाले तेव्हा सर्वांनी कौतुक केलेच पण भुवया उंचावून हे शिवधनुष्य पेलवतील कि नाही याबाबत देखील आशंका घेतली. **कोंडाजी फर्जंद फक्त ६० मावळ्यांना** घेऊन पन्हाळागडाच्या दिशेने निघाला. त्यामध्ये त्याने अशी काही योजना वापरली कि शत्रूला ६० नव्हे तर ६००० मावळे वाटतील. त्यांना केलेला कलकलाट, "हर हर महादेव"अशी दिलेली शिव गर्जना ऐकून मोगल्याचे अर्ध्याहून अधिक शिपाई पळून गेले जे राहिले त्यांचा बंदोबस्त मावळ्यांनी केला. कोंडाजी फर्जंद या वीराने फक्त ६० मावळ्यांना घेऊन **फाल्गुन कृ त्रयोदशी शके १५९५, ३ मार्च, १६७३** पन्हाळगड काबीज केला.



त्या धैर्यवान मावळयाला शत-शत नमन करून एक-एक जण बाहेर पडू लागले.

तिथून पुन्हा बाजूच्या लेण्यांमध्ये गेलो. त्या ठिकाणी प्रत्येक दिशेला छोट्या खोल्या कोरल्या होत्या. आम्ही ज्या लेण्यांमध्ये शिरलो त्याच्या समोरच्या खोलीमध्ये गेलो. ती खोली पाहिली असता तिथे दगडा मध्येच बसण्याची व्यवस्था केली होती. तिथे २ व्यक्ती आरामात झोपू शकतात असे दिसून आले.

*ज्याप्रमाणे ऋषीमुनी ईश्वराच्या सानिध्यात जाण्यासाठी आणि त्याचे कृपादृष्टी होण्यासाठी ध्यान करायचे तसे घ्यान आम्ही काही क्षण केले. त्यावेळी आमच्या मनाला आणि क्षीणलेल्या देहाला खूप समाधान भेटले. काही क्षण का होईना पूर्ण जगाचा विसर पडला. डोळे मिटल्यावर समोर दिसला तो काळाकुट्ट अंधार, याच अंधारात आपण कोण आहोत याची ओळख तात्पुरती पुसून टाकली. खरंच आपलं अस्तित्व तरी काय.? आणि असलं तरी किती असणार.? आपण जिवंत असेपर्यंत, नाहीतर आपली मुले-बाळे जिवंत असेपर्यंत, पण अखेर आपणही गुमनाम होऊन जाऊ. हि कातळात खोदलेली लेणी पहिल्या किंवा तिसऱ्या शतकातील आहेत म्हणजे जवळ जवळ दोन हजार वर्षांपूर्वीची आहेत. हि लेणी कालही होती, आजही आहेत आणि उद्याही असणार पण आपण...?*

डोळे उडताच विवेकाचा एक किरण अंतर्मनाला भेदून गेला. या विश्वात जे अखंड आहे, जे निश्चळ आहे त्याची ओळख करून घेऊन त्यामध्ये एकरूप होऊन जावं. काही क्षणाच्या समाधीत पूर्ण जीवनाचे उत्तरच भेटले या अर्विभावात आम्ही बाहेर पडलो. जगाकडे आणि अंतर्मनाकडे पाहण्याचा एक दुवाच या क्षणभर समाधीमध्ये भेटला.



लेणाद्री गणपती आणि त्याबाजूचा मोजक्या लेण्या पाहून आम्ही आता ओझर येथील विघ्नहराचे दर्शन घेण्यासाठी खाली उतरू लागलो. जाताना अवघड वाटणाऱ्या पायऱ्या आता सोप्या वाटू लागल्या होत्या. झर-झर आम्ही खाली येत होतो. थोड्याच वेळात आम्ही पूर्ण पायऱ्या उतरून खाली आलो.

खाली आल्यावर दुकानांमध्ये सुकामेवाचे ढीगच्या ढीग लागले होते. पण आम्हाला ओझरला जायचे होते. मी विचार केला कि इथे घेण्यापेक्षा तिकडून घेऊ असे म्हणत गाडीजवळ येण्यासाठी निघालो. त्यातही एका दुकानातून किरण याने शीत पेय आपल्या स्वखर्चात आम्हा मावळयांसाठी विकत घेतले आणि आम्ही साऱ्यांनी पिऊन मन शांत केले. सगळे लगबगीने गाडीत आपापल्या जागेत बसले.


पुन्हा एकदा शिवरायांचा आणि गणरायाचा जयघोष करून मोठ्या आतुरतेने ओझरला निघालो.

ओझरला जाताना मध्ये गाडीतून शिवनेरी दर्शन होत होते. दुपारचे १.०० वाजून गेले होते. सगळ्यांना भूक लागली होती. ओझरला पोहोचताच मी ओझर विश्वस्तमध्ये महाप्रदाची कोणती सोय होते का ते पाहायला गेलो. पण त्या दिवशी **मंगळवार आणि संकष्टी चतुर्थी** असल्यामुळे खूप गर्दी होती त्यामुळे तिकडेच एका हॉटेलमध्ये जेवणाची व्यवस्था करण्यास सांगितले.

अगोदर पोटपूजा आणि मग देवपूजा या म्हणीप्रमाणे आम्ही सुरवातीला पोटपुजेसाठी हॉटेलमध्ये बसलो. सगळ्यांसाठी जी हवी ती थाळी मागवली. थाळी यायला खूप उशीर होत होता पण वाट पाहण्याखेरीज कोणता पर्याय नव्हता. मोठ्या अधीरतेने आम्ही थाळीची वाट पाहू लागलो काही वेळाने आमच्या समोर आमची थाळी आली आणि आम्ही सगळ्यांनी जेवायला पटापट सुरवात केली. सगळ्याचे जेवण झाल्यावर आम्ही **ओझरच्या विघ्नहराचे** दर्शन घेण्यासाठी निघालो.

वाटेवर फुलांच्या आणि मोदकांच्या दुकानांमध्ये खूप गर्दी होती. तिथूनच एका दुकानातून मी फुलांची वाटी आणि प्रसाद घेतला. अजुनही मंदिराच्या सभागृहात प्रवेश केला नव्हता. मंदिराच्या बाहेरच रांगेत उभे होतो. थोड्या वेळाने सभागृहात प्रवेश केला तेव्हा थोडे बरे वाटले, कारण भर दुपारी आम्ही दर्शनाच्या रांगेत उभे होतो. सभागृहात प्रवेश केल्यावर समोरच श्री विघ्नहराचे दर्शन एका टेलिव्हिजन च्या मार्फत झाले. हळू हळू रांग पुढे सरकत होती. थोड्या वेळाने सभागृह पार करून मंदिरात प्रवेश केला. पण तिकडे गेल्यावर समजले कि मुख दर्शन सभामंडपात आपण प्रवेश केला आहे.

मुख्य **मंदिराच्या बाहेर २० फुटांचा सभामंडप** आहे त्याच्या कडेला मंदिराच्या संरक्षणासाठी मजबूत अशी भिंत उभी आहे. आम्ही भिंतीच्या कडेला रांगेत उभे होतो. खूप वेळ झाला होता, अधून मधून श्री गणरायाचे आणि श्री छत्रपती शिवाजी महाराजाचा जयघोष घेत होतो. मी, माझ्या सोबत मनोहर पुढे बाळकृष्ण आणि सर्वात पुढे रमेश कारभारी होता. मध्येच रमेशने माझ्या बाजूला येऊन फुलांच्या वाटी मधला मोदकांचा प्रसाद घेतला आणि आम्हा भाविकांना वाटला. खऱ्या देवाचं स्थान हे आपल्या अंतरात असतं, आपले अंतर्मन समाधानी असेल तर आपणही समाधानी होऊन तो आनंद इतरांना हि देऊ शकतो. मोदकांचा प्रसाद




गणरायाच्या चरणी अर्पण न करता आम्ही shri ganrayachach आशीर्वाद समजून भक्षण केला.

वेळाने आम्ही मुख्य मंदिराच्या गाभाऱ्याकडे गेलो. तिथे लोखंडी शिडी लावली होती. त्याचठिकाणी पुन्हा आमच्या दोन अश्या वेगवेगळया रांगा तयार झाल्या व काही मिनिटामध्ये आम्ही गाभाऱ्यात प्रवेश केला. तिथे फुले श्री चरणी वाहिली व डोळे भरून श्री विघ्नहराचे रूप पाहते झालो. सुरक्षारक्षक आम्हाला पुढे

जाण्यासाठी विनंती करत होता, त्या विनंतीचा मान राखूनच एकदा पुन्हा गणरायाला वंदन करुन गाभाऱ्यातून बाहेर आलो. या मंदिरावर सोनेरी कळसही चढविण्यात आला होता.

*या **मंदिराची अशीही आख्यायिका** सांगितली जाते की, राजा अभिनंदाच्या यज्ञात विघ्न आणण्यासाठी इंद्राने विघ्नासूर नावाच्या राक्षसाची निर्मिती केली. विघ्नासुराने यज्ञामध्ये विघ्न आणायला सुरवात केल्यावर ऋषीमुनींनी गणरायाची प्रार्थना केली. तेव्हा गणराय प्रगट होऊन विघ्नासुराला पराभूत केले. पराभूत विघ्नासुर श्री गणरायाला शरण आला. त्यावर श्री गणराय विघ्नासुरावर प्रसन्न होऊन विघ्नासुराला सांगितले कि, ज्या ठिकाणी माझी भक्ती केली जाते त्याठिकाणी तू कोणतेच विघ्न आणू नकोस. यावर विघ्नासुरानेही श्री गणरायाला भक्तिपुर्वक विंनती केली कि तुझ्या नावाअगोदर भक्तांनी माझे नाव घ्यावे व तुम्ही याच ठिकाणी वात्सव्य करावे. तेव्हा पासून श्री गणराय या ठिकाणी विघ्नहर या नावाने प्रसिद्ध झाले.* **विघ्नहर म्हणजे विघ्नाचा नाश करणारा, आपल्यावर येणाऱ्या हर एक संकटाना आपल्या शक्तीने दूर करणारा असा हा विघ्नहर.** त्या दीपमाळेकडे पाहून पेशवे कालीन याची सजावट किती मनमोहक असेल हा विचार आला.

मंदिराच्या बाहेर आल्यावर मोदक (प्रसाद) घेण्यासाठी दोन-तीन दुकाने फिरलो. शेवटी एका दुकानामधून मोदकांचा प्रसाद (कंदी पेढे) घरी आणण्यासाठी घेतला. लेण्याद्रीच्या पायथ्याशी सुका मेवा होता पण तो या ठिकाणी नसल्याने मनाला रुखरुख लागली. आम्ही आमच्या मुलांसाठी खेळणी पाहत होतो. शेवटी

एखाद पसंद केले व तिथून विकत घेतले. तसेच सहचारिणीसाठीही न विसरता अमूल्य अशी भेट आम्ही घेतली व गाडी पार्किंग केली होती त्याठिकाणी आलो.

गाडीजवळ आलो तेव्हा तिथे कुणीच नव्हते म्हणुन बाजूलाच कुकडी नदीचे पात्र पाहण्यासाठी गेलो. तिथे प्रथम नदीच्या पात्रात उतरुन हात-पाय आणि चेहरा पाण्याने स्वच्छपणे धुवून घेतला. त्या कुकडी नदीच्या पात्रामध्ये उभे राहून विघ्नासुराचे मनमोहक दर्शन घेत होतो. खूप वेळ त्याठिकाणी बसून नदीच्या जलाशयात पाय मोकळे करून बसलो.

आता कधी या ठिकाणी येऊ हा विचार मनात येत होता. आज सकाळी शिवजन्म भूमीचे दर्शन घेतले. छत्रपती शिवाजी महाराजरुपी सूर्यसम युगपुरुषाने हिंदवी स्वराज्य स्थापन केले आणि छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या कठोर मनोबलाने ते मजबूत केले. छत्रपती शाहू महाराजांच्या आश्रयाखाली पेशव्यांनी **स्वराज्याच्या पताका पूर्ण भारत भूमीवर पसरवल्या. त्याच पताकाचा एक भाग या ओझरच्या विघ्नाहराच्या कळसावर होता.** स्वराज्यासाठी अनेकांनी आपल्या जीवाची बाजी लावली होती. याचं भगव्या झेंड्यामध्ये, भगव्या झेंड्यासाठी कित्येकांनी रक्त सांडलं असेल. अनेक जिवांच्या आहुतीने याचा रंग भगवा झाला असावा आणि असेलही, काळोखावर प्रचंड विजय मिळवणारा सूर्यही सुरवातीला भगवा रंगचं घेऊन येतो आणि जगाला स्वतःच्या स्वराज्यमय भगव्या रंगात मनसोक्त रंगवतो. *हाच तो जरीपटका विघ्नहर्त्याच्या सोनेरी कळसावर साज चढवुनी शिवरायांच्या कर्तुत्वाला वादळ वाऱ्यात उभा राहून मुजरा करतोय. न कळत माझी हि मान मुजऱ्यासाठी खाली झुकली.*

मनोमनी शिवजन्मभुमी आठवुन डौलाने फडकणाऱ्या भगव्या झेंड्याला मुजरा केला. कुकडी नदीच्या पात्रात अखंड बुडालेले पाय आणि मन बाहेर आले व

आमच्या गाडीजवळ जाऊ लागले. आमच्या आधीच सर्वजण आले होते फक्त माझीच वाट पाहत होते. गाडीमध्ये बसण्याच्या अगोदर अष्ठविनायकाच्या सातव्या गणपतीला म्हणजे ओझरच्या विघ्नहर्त्याला नमस्कार करून आम्ही निघालो.

आम्ही आता ओतूरच्या दिशेने जात होतो. ओतूर ओझरपासून फक्त १३ किलोमीटर अंतरावर होते. तिथून मग कल्याण - अहमदनगर महामार्गाने जाणार होतो. तिकडच्या रहिवाशी लोकांना मार्ग विचारत आम्ही ओतूरला महामार्गाजवळ पोहोचलो. आता आमच्या गाडीने वेग धरला होता याचं भान रमेश कारभारीला झाल्यावर त्याने चालकास वेग कमी करण्यास सांगितले. थोड्याच वेळात आम्ही पिंपळगाव धरणाच्या बाजूने माळशेज घाटाजवळ जात होतो. संध्याकाळी पिंपळगाव धरणाचे भले मोठे जलाशय आणि समोरचा उत्तुंग असा माळशेज घाट पाहून असे वाटले कि माळशेज आपले चरण पिंपळगावच्या धरणात पाण्याच्या जलधारांनी धुवत आहे. आता पावसाची चाहूल लागली होती. रिम-झिम पाऊस बरसायला लागला. त्या रिम-झिम बरसणाऱ्या पावसाने माळशेज घाटाचे रौद्र रूपही मनाला आकर्षित करत होते. आम्ही माळशेजला पोहोचलॊ तेव्हा रस्ताच्या कडेला वाहनांची खूप गर्दी होती. त्यामधून निसर्ग प्रेमी गाडीतून उतरून घाटावरुन येणाऱ्या धबधब्यावरून कोसळणाऱ्या पाण्यात भिजत होती. काही जण गाडी मधुन जोरात गाणी लावून गाण्याच्या तालावर ताल धरून नाचून मजा करताना दिसली. त्याठिकाणी आम्हालापण गाडी थांबविण्याची इच्छा झाली पण थांबिवली नाही. आपण ज्या क्षेत्रावरून आलोय त्यातून भेटलेल्या आनंदाची तुलना येथे भिजून होणार याची कल्पना होती.

**माळशेजच्या घाटावर आल्यावर मला रात्री पाहिलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या फलकांची आठवण झाली.** इतिहासाच्या

पाऊलखुणा शोधायचा प्रयत्न करू लागलो. तेव्हा असे समजले कि शिवाजी महाराजांनी आपली एक परभणी येथे मोहीम आखली होती. ही मोहीम पूर्ण झाल्यावर जेव्हा कल्याणला येण्यासाठी निघाले तेव्हा याचा सुगावा मोगलांना लागला आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा मार्ग अडविला गेला. मोगलांची आणि मराठयांची संगमनेर येथे लढाई झाली. मोंगलांकडून इनायतखान मराठ्यांवर जोरदार प्रहार करत होता हे युद्ध शिवरायांनी जिंकले पण सिंदोजी निंबाळकर हा स्वराज्याचा अनमोल मोहरा खर्ची पडला. मोगलांची पीछेहाट झाल्यावर छत्रपती शिवाजी महाराज लगबगीने कल्याण दिशेकडे निघाले; पण जेव्हा युद्ध चालू होते तेव्हाच छत्रपती शिवाजी महाराज या मार्गाने येतील म्हणून मोघलांनी पुणे कडून सुपे मार्गे आणि टोकावडे मार्गे कल्याण या ठिकाणी आणखी सैन्याची कुमक मागवून नाकाबंदी केली होती.

छत्रपती शिवाजी महाराज हे नेहमीच योजनाबद्ध मोहीम पूर्णत्वास न्यायचे, यावेळी तिन्ही बाजूस अडकूनसुद्धा माळशेजमधील याच खिंडीचा वापर करून कल्याणच्या दिशेने आपल्या स्वारांसोबत निघून गेले. आता ही खिंड अवघडलेली दिसत असेल; अनेक उन्हाळे-पावसाळे सोसून या खिंडीतली वाट आता बंद झाली असेल पण कधीकाळी या खिंडीने स्वराज्याच्या मुकुटमणीला संरक्षण दिले होते.

अशा कितीतरी वाटा असतील या सह्याद्रीच्या कुशीत ज्यानी आपल्या मायेचा हात शिवरायांवर सदैव सावली सारखा धरून ठेवला असेल. अश्याच एका बेनामी असणाऱ्या एका खिंडीचे मुख दर्शन आम्हाला या किल्ले शिवनेरीच्या ओढीने पूर्ण झाले.

संध्याकाळचे सांज किरण माळशेज घाटाच्या सौंदर्यात भर घालत होते. आमची गाडी घाटातून नागमोडी वळणे घेत धीम्या गतीने घाट उतरत होती. अनेक

मदमस्त झरे, ओढे पावसाच्या पाण्यासोबत दंगा-मस्ती करत बेभानपणे हिरवी शाल पांघरलेल्या जमिनीवर दौडत येत होते. फेसाळणाऱ्या पाण्यावर मध्येच गोल रिंगण घालून लता-वेली पाना-फुलात फेर धरून नाचत होती.

माळशेज घाट उतरल्यावर एका ठिकाणी आमची गाडी चहा-पाण्यासाठी एका ठिकाणी थांबली. तिथे चहाचा घोट घेऊन माळशेजचे सौंदर्य मनात साठवून घेत होतो. कल्याण बंदरात उतरणारा माल मुरबाड, वैशाखरे मार्गाने सह्याद्रीची रांग ओलांडून घाट माथ्यावरील बाजारपेठेत जात असे. घाटमाथ्यावर व्यापारी मार्गाचे संरक्षण आणि नजर ठेवण्यासाठी ठिकठिकाणी किल्ले बांधले.

या प्रवासात खूप काही शिकलो, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य रक्षणासाठी पाठीशी उभा असलेल्या सह्याद्रीच्या बेलाग कड्याना शतशः नमन करून गाडीत बसलो.

**असाच डौलाने फडकत रहावा,**

**श्री शिवनेरीवर ध्वज हा भगवा.....!**

**हिंदवी स्वराज्य संस्थापकाची जन्मभूमी,**

**तो ``देव'' अन आत्मा ``शिवबा'' माझा......!**


Anish Patil PHOTOGRAPHY

**या मोहिमेत सहभागी होणारे सदस्य - उजवीकडून**

*अनिल पाटील जयेश मेंदाडकर अक्षय कांबळे*

*बाळकृष्ण घावटे किरण वेटकोळी हितेश मेंदाडकर*

*नवनीत कांबळे अनेश पाटील रमेश कारभारी*

*सुशांत बसवत रोहित वास्कर*

*मनोहर मेंदाडकर सिद्धेश (ड्रॉइव्हर)*

*आणि आमचा फोटो काढणारा*

*अमृत पाटील*



**शिवनेरी किल्ल्यावर पहाण्याची ठिकाणे :**

जुन्नरहून डांबरी रस्ता आपणास गडाच्या पायऱ्यांपाशी घेऊन जातो. या वाटेने गडावर येतांना सात दरवाजे लागतात. पहिला महादरवाजा, दुसरा पीर दरवाजा, तिसरा परवानगीचा दरवाजा, चौथा हत्ती दरवाजा, पाचवा शिपाई दरवाजा, सहावा फाटक दरवाजा आणि सातवा कुलाबकर दरवाजा.

सात दरवाज्यांच्या वाटेने गडावर येतांना पाचवा म्हणजे शिपाई दरवाजा पार केल्यावर मुख्य वाटसोडून उजव्या बाजूने पूढे गेल्यावर 'शिवाई देवीचे' मंदिर लागते. मंदिराच्या मागे असणाऱ्या कड्यात ६ ते ७ गुहा आहेत. या गुहा मुक्कामासाठी अयोग्य आहेत. मंदिरात शिवाई देवीची मूर्ती आहे. शेवटच्या दरवाज्यातून गडावर प्रवेश केल्यावर समोरच अंबरखाना आहे. आजमितिस या अंबरखान्याची मोठ्या प्रमाणात पडझड झाली आहे. मात्र पूर्वी या अंबरखान्याचा उपयोग धान्य साठविण्यासाठी केला जात असे. अंबरखान्यापासून दोन वाटा निघतात, एक वाट समोरच असणाऱ्या टेकाडावर जाते. या टेकाडावर एक कोळी चौथरा आणि एक इदगाह आहे. दुसरी वाट शिवकुंजापाशी घेऊन जाते, वाटेत गंगा, जमुना व याशिवाय पाण्याची अनेक टाकी लागतात.

जिजाउंच्या पुढ्यात असलेला बालशिवाजी, हातातील छोटी तलवार फिरवीत आईला आपली भव्य स्वप्ने सांगत आहे, अशा अविर्भावातील मायलेकरांचा पुतळा 'शिवकुंजा' मध्ये बसविला आहे. शिवकुंजासमोरच कमानी मशिद आहे आणि समोरच खाली पाण्याचे एक टाके आहे. येथून समोर

चालत गेल्यास हमामखाना लागतो. येथूनच पुढे शिवजन्मस्थानाची इमारत आहे. ही इमारत दुमजली असून खालच्या खोलीत जिथे शिवरायांचा जन्म झाला, तेथे शिवरायांचा पुतळा बसविण्यात आला आहे. इमारतीच्या समोरच 'बदामी पाण्याचे टाकं' आहे. येथून पुढे जाणारा रस्ता कडेलोट टोकावर घेऊन जातो. सुमारे दिड हजार फुट उंचीचा ह्या सरळसोट कड्याचा उपयोग हा गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी होत असे. गड फिरण्यास २ तास लागतात.

किल्ल्यावरून चावंड, नाणेघाट आणि जीवधन तसेच समोर असणारा वडूज धरणाचा जलाशय लक्ष्य वेधून घेतो

पोहोचण्याच्या वाटा :

गडावर जाण्याचे दोन प्रमुख मार्ग जुन्नर गावातूनच जातात. पुणेकरांना तसेच मुंबईकरांना एका दिवसात शिवनेरी पाहून घरी परतता येते.

१) साखळीची वाट :-

या वाटेने गडावर यायचे झाल्यास जुन्नर शहरात शिरल्यानंतर नव्या बसस्टँड समोरील रस्त्याने शिवपुतळ्यापाशी यावे. येथे चार रस्ते एकत्र मिळतात. डाव्या बाजूस जाणाऱ्या रस्त्याने साधारणत: एक किलोमीटर गेल्यावर रस्त्याच्या उजव्या कडेला एक मंदिर लागते. मंदिरासमोरून जाणारी मळलेली पायवाट थेट शिवनेरी किल्ल्याच्या एका कातळभिंतीपाशी घेऊन जाते. भिंतीला लावलेल्या साखळीच्या साह्याने आणि कातळात खोदलेल्या पायऱ्यांच्या साह्याने वर

पोहोचता येते. ही वाट थोडी अवघड असून गडावर पोहोचण्यास पाऊण तास लागतो.

२) सात दरवाज्यांची वाट :-

शिवपुतळ्यापासून डाव्या बाजूच्या रस्त्याने चालत सुटल्यास डांबरी रस्ता आपणास गडाच्या पायऱ्यांपाशी घेऊन जातो. या वाटेने गडावर येतांना सात दरवाजे लागतात. पहिला महादरवाजा, दुसरा पीर दरवाजा, तिसरा परवानगीचा दरवाजा, चौथा हत्ती दरवाजा, पाचवा शिपाई दरवाजा, सहावा फाटक दरवाजा आणि सातवा कुलाबकर दरवाजा. या मार्गे किल्ल्यावर पोहोचण्यासाठी दीड तास लागतो.

३) मुंबईहून माळशेज मार्गे :-

जुन्नरला येतांना माळशेज घाट पार केल्यावर ८ ते ९ किलोमीटरवर 'शिवनेरी १९ किमी' अशी एक पाटी रस्त्याच्या कडेला लावलेली दिसते. हा मार्ग गणेश खिंडीतून शिवनेरी किल्ल्यापर्यंत जातो. या मार्गाने गडावर पोहोचण्यास एक तास लागतो.

राहाण्याची सोय :

या किल्ल्यावर शिवकुंजाच्या मागील बाजूस असणाऱ्या वऱ्हांड्यामध्ये १० ते १२ जणांची रहाण्याची सोय होते.

जेवणाची सोय :

किल्ल्यावर जेवणाची सोय नसल्याने ती व्यवस्था आपण स्वत:च करावी.

पाण्याची सोय :

गंगा व जमुना या टाक्यांमध्ये बारामही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे.

जाण्यासाठी लागणारा वेळ :


साखळीच्या मार्गे पाउण तास, सात दरवाजा मार्गे दीड तास लागतो.

**{ सौजन्य : ट्रेकक्षितिज.कॉम }**



SHOT ON REDMI NOTE5 PRO
Anish Patil PHOTOGRAPHY


SHOT ON REDMI NOTE5 PRO
MI DUAL CAMERA


Anish Patil PHOTOGRAPHY


Anish Patil PHOTOGRAPHY


Anish Patil PHOTOGRAPHY


अष्टविनायक दर्शन
Junnar's Tour Guide
We Provide Tour Guide
Anish Patil
PHOTOGRAPHY


Anish Patil
PHOTOGRAPHY





वन विभाग, जुन्नर
बाजीप्रभू देशपांडे
उद्यान


वन विभाग, जुन्नर
जिवा महाला उद्यान
(होता जिवा म्हणून वाचला शिवा)

अनिल महादेव पाटील  यांचे ई साहित्यवर प्रकाशित पुस्तक.

कव्हरवर क्लिक करताच ओपन होईल.



# ई साहित्य प्रतिष्ठान

## महा-राष्ट्र

महाराष्ट्राहून श्रीमंत असं जगात कोणतंही राज्य, देश, खंड नाही. संपूर्ण जगातील लेण्यांपैकी निम्मी लेणी भारतात आहेत आणि भारतातील १२०० लेण्यांपैकी ९०० एकट्या महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रातील जवळपास प्रत्येक तालुक्यात एक किल्ला आहे (358 तालुके- ४५० किल्ले) आणि संपूर्ण जगात इतक्या जास्त प्रमाणात किल्ले कुठेही नाहीत. कारण इतक्या मोठ्या प्रमाणात लढाया लढणारी जमात जगाच्या पाठीवर कुठे नसेल. आणि अशा लढवय्या पूर्वजांचे आपण वंशज आहोत याचा हे किल्ले हा पुरावा आहे.

ई साहित्यतर्फ़े गेली अनेक वर्षे दुर्ग दुर्घट भारी नावाची एक सिरीज चालू आहे. आपल्या आजूबाजूला असलेल्या किंवा आपण भेट दिलेल्या दुर्गांची माहिती व फ़ोटो कृपया आम्हाला पाठवा. आम्ही त्याचे पुस्तक बनवून आपल्या नावाने ते प्रसिद्ध करू. त्याचा उपयोग करून लोक या दुर्गांना भेट देऊन या श्रीमंतीचा अनुभव घेतील.

चला तर लिहा आणि पाठवा : esahity@gmail.com

सुनील सामंत

टीम ई साहित्य